# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**सकाळ**

**दिनांक २३.०६.२०२२ गुरूवार**

**(गुन्हे)**

**१) दारुबंदी, जुगार व ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :**

मु.दा.का अन्वये ०४ केसेस ०४ आरोपींना अटक करून रू २,८४०/— चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०४ केसेस ०६ आरोपींना अटक करून रू ३४,१३०/— चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण ३,०१३ वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून एकूण तडजोड शुल्क रू २,१०,३००/— वसुल करण्यात आले आहेत.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) पो.स्टे. एम.आय.डी.सी. :— खुनाचा प्रयत्न करण्याऱ्या आरोपीस अटक:—**

दिनांक २२.०६.२०२२ चे ०६:०० वा चे सुमारास फिर्यादी सुरेश रामभाउ ठाणेकर वय ५२ वर्ष रा. फुटपाथवर एकात्माता नगर, जयताळा नागपुर हे आपल्या मित्रा सोबत पो.स्टे. एम. आय.डी.सी. हद्दीत आरोपी गणेश गुणीराम प्रसाद वय ४९ वर्ष रा. प्लॉट नं. २९ डोंगरे ले—आउट, जयताळा, नागपुर यांच्या दुेनात सिगारेट घेण्या करीता गेले असता. आरोपी याने फिर्यादी सोबत शाब्दिक वाद विवाद करून आरोपीने आपल्या घरातुन सर्विस रिवॉल्वर आणुन फिर्यादीच्या अंगावर गोळी मारून जिवोनिशी ठार मारण्याचा प्रयत्न केला. फिर्यादी जख्मी झाल्याने त्यांना उपचारासाठी मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. एम. आय.डी.सी. येथे पोउपनि जाधव, ८०१०९५२०६४ यांनी आरोपी विरूध्द कलम ३०७ भादंवि अन्वये गुन्हा नोदविला आहे. आरोपी अटक आहे.

**३) पो.स्टे. एम.आय.डी.सी. — दुखापत करण्याऱ्या आरोपीस अटक :**

दिनांक २२.०६.२०२२ वा. चे ०६:३० वा. ते ०७:०० वा चे दरम्यान पो.स्टे. एम.आय.डी. सी. हद्दीत फिर्यादी चिंतादेव गणेश प्रसाद वय ४० वर्ष रा. प्लॉट नं. २९ डोंगरे ले—आउट, जयताळा, नागपुर हया आपल्या किराणा दुकानात असताना आरोपी १) पुरूषोत्तम उर्फ पुप्प हिरामन सोनेकर वय ३५ वर्ष रा. डोंगरे ले—आउट, स्वास्तिक नगर जयताळा, नागपुर २) सुरेश रामभाउ ठाणेकर वय ५२ वर्ष रा. फुटपाथवर एकात्माता नगर, जयताळा नागपुर यांनी फिर्यादी सोबत सिगारेट घेण्याच्या कारणा वरून वाद करून फिर्यादीच्या पतीला '' तु बाहर निकल तेरे को बताते '' असे बोलुन तेथुन निघुन गेले व काही वेळानी परत आले आरोपी क्रं. २ याने फिर्यादीच्या पतीला लोखंडी दराती ने मारून जख्मी केले तसेच आरोपी क्रं. १ याने फिर्यादीला व त्यांच्या पतीला लाकडी बांबुने मारून जख्मी केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. एम.आय.

डी.सी. येथे पोउपनि जाधव, ८०१०९५२०६४ यांनी आरोपी विरूध्द कलम ३२६,३२४,२९४,३४ भादंवि अन्वये गुन्हा नोदविला आहे. आरोपी अटक आहे.

.

**४) पो.स्टे. इमामवाडा — घरफोडी :**

दिनांक २०.०६.२०२२ चे ०८:०० वा. ते २२.०६.२०२२ चे १८:५० वा. चे दरम्यान पिंटु उध्दवराव बागडे, वय ४९ वर्ष, पो.स्टे. इमामवाडा हद्दीत बलदेव सावजी बिल्डींगच्या मागे नागपुर येथे राहणारे फिर्यादी हे आपल्या परीवारा सह हिंगणा येथे मयतीच्या कार्यक्रमाला गेले असता. दिंनाक २२.०६.२०२२ वा झारी आले असता त्यांना मुख्य दाराचे कुलुप तुटलेले दिसले, घराच्या आत मधील कपाटाचे लॉकर सुध्दा तुटलेले दिसले. कोणत्या तरी अज्ञात आरोपीने आत प्रवेश करून कपाटामध्ये ठेवलेले नगदी ८,०००/—रू व सोनेचांदीचे दागीने असा एकुण २,४२,२५०/—रू चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. इमामवाडा येथे पोहवा गजानन, ९८२३८२६३६२ यांनी आरोपी विरूध्द कलम ४५४,४५७,३८० भादवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**(इतर)**

**गुन्हे शाखा येथील सामाजिक सुरक्षा विभागाची कामगिरी :—**

दिनांक २२/६/२०२२ रोजी पोलीस निरीक्षक ललीता तोडासे सामाजिक सुरक्षा विभाग गुन्हे शाखा यांना खात्रीशिर माहिती मिळाली होती की पो. स्टे. कळमना हद्दीतील चिखली चौक येथे सार्वजनिक ठिकाणी नागपूर शहर येथे महिला नामे कविता बांन्ते ही स्वत:चे आर्थीक फायद्याकरीता पिडीत महिलांना पैशाचे आमिष दाखवुन देहव्यापारास प्रवृत्त करून पिडीत महिलांना ग्राहक पुरवुन देहव्यापार करवुन घेतात. अशी माहिती मिळाल्यावरून स्टॉफ सह सदर ठिकाणी सापळा रचुन सदर ठिकाणी धाड टाकली.

सदर ठिकाणी महिला आरोपी कविता आनंद बांन्ते वय ५० वर्ष रा. डिप्टी सिग्नल ललवा पान ठेल्याजवळ पोस्टे कळमना नागपूर शहर हिने ३ पिडीत मुलीला पैशाचे आमिष देवुन स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता बोलावुन पीडीत मुलीना ग्रांहकास देहव्यापार करण्यासाठी पुरवुन त्यांना देहव्यापार करण्यास प्रवृत्त केले. सदर महिला आरोपी विरूद्ध कलम ४,५, अन्वये अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम—१९५६ अन्वये पो.स्टे. कळमना नागपूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला. व ३ पिडीतांची सुटका करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोस्टे कळमना अधिकारी करीत आहे.

सदरची कामगिरी नागपुर शहराचे मा. अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री नविनचंद्र रेड्डी, मा. पोलीस उपायुक्त (गुन्हे), श्री. चिन्मय पंडीत, मा. सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री रोशन पंडीत, यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. ललीता तोडासे, सपोनि संतोश जाधव, नापोअ राशीद शेख, भुशन झाडे, चेतन गेडाम, पोअ. समीर शेख, पोअं सुधिर तिवारी, म.पोहवा रिना जाउळकर यानी केली

(राहुल डोंगरे)
सहा. पोलीस निरीक्षक
पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर